जीवेत शरदः शतम् !

रयत शिक्षण संस्थेचे,

# रा.ब.नारायणराव बोरावके महाविद्यालय,श्रीरामपूर

## (करिअर महोत्सव २०२१)

# इतिहास विषयातील करिअर संधी

- फोटोग्राफी
- प्रेस फोटोग्राफी
- जर्नालीसेम फोटोग्राफी
- पर्यटन क्षेत्रातील संधी
- टुरिझम मार्गदर्शक (गाईड)






## रयत शिक्षण संस्था,
## रा. ब. नारायणराव बोरावके महाविद्यालय, श्रीरामपूर
## करिअर महोत्सव - २०२१
## विषय : - इतिहास विषयातील नोकरीच्या संघी

# फोटोग्राफी



फोटो म्हटले की, लहान मुलांनाच काय तर अनेकांना त्याचे कुतुहल असते. या कुतुहलातून फोटोग्राफी हा व्यवसाय जन्माला आला. अशा क्षेत्रामध्ये आपण करिअर करायचे म्हटले की काही गुण आवश्यक असतात.

आवड, उत्तम नजर, कलात्मक दृष्टीकोन, शारिरीक लवचिकता तसेच संयम व समयसुचकता, कल्पना, कौशल्य, धंद्याची उत्तम जाण, दीर्घकाळ काम करण्याची मानसिकता इ. गोष्टी तुमच्या जवळ असतील तर तुम्ही आपले करिअर उज्वल करु शकता. फोटोग्राफीमध्ये तुम्ही पुढील शाखांतून करिअर करु शकतात. हे अभ्यासक्रम तीन महिने ते दोन वर्षापर्यंत कालावधीचे असतात. ज्याला फोटोग्राफीची आवड आहे. त्यानेच या व्यवसायात आपले करिअर करावे.

**१. कमर्शियल फोटोग्राफी :**

यामध्ये फोटो स्टुडिओ प्रस्थापित करणं डेव्हलपिंग, प्रिंटींग, एनलार्जमेंट, आयडेंटिटीकार्ड फोटो, तसेच विशेष प्रसंग यांचे चित्रण करणे इत्यादी म्हणजे ही एक फोटोग्राफीमधील पारंपारिक शाखा होय. कॅमेरे, फिल्मस, आल्बम्स, बॅटरी, सेल्स, लाईटस्, लाईट शेड्स अशा फोटोग्राफीला आवश्यक अशा साहित्यांची विक्री करुन भरपूर उत्पन्न मिळविता येते.

**२. इंडस्ट्रिअल फोटोग्राफी :**

यामध्ये कंपन्यांचे अहवाल, संचालक मंडळाच्या सभा, कंपनी नियतकालिका, उत्पादनांचे छायाचित्रण या गोष्टींचा समावेश होतो.

**३. प्रेस फोटोग्राफी :**

प्रेस फोटोग्राफर्सना प्रादेशिक, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय घटनांचे साक्षीदार व्हावं लागतं. भटकंती करावी लागते. सर्व घडराऱ्या घडामोडी तत्परतेने टिपून त्या वृत्तपत्रांना पोचविणं आवश्यक असते. त्यासाठी प्रसंगाचं गांभीर्य, गोपनीयता या गोष्टी सांभाळाव्या लागतात.

**४. फोटो जर्नालिझम :**

फोटो जर्नालिझम व प्रेस फोटोग्रापी म्हणजे त्यांनी निर्माण केलेला अंतिम परिणाम. प्रेस फोयोग्राफर एखादा प्रसंगी चित्रित करतो. तर फोटो जर्नलिस्ट एखाद्या प्रसंगाची मालिका तयार करतो (उदा. शिखरवार्ता परिषद, सार्क परिषद व लोकसभेतील कामकाज इ.) व त्यावर आपले मत प्रदर्शन करु शकतो. त्यामध्ये लोकांशी सुसंवाद करता येणं महत्वाचं असतं.

**५. फॅशन फोटोग्राफी :**

यामध्ये जाहिरात कंपन्या मॉडेल्स आणि अनेक माध्यम याच्यांशी संबंध ठेवून यशस्वी व्हावे लागते. कौशल्य व कलात्मकता खूप महत्वाची असते.

**६. पोर्टेचर (व्यक्तीचित्रण) फोटोग्राफी :**

जाहिरात व पॅशन मॉडेलिंग करु इच्छिणाऱ्यांना व्यक्तीचे छायाचित्रण करुन त्याचे अल्बम Portfolio बनविणे हा या शाखेतील कुशलांचा प्रमुख व्यवसाय

**७. मेडिकल टेक्निकल व सायंटिफिक फोटोग्राफी :**

माहिती व माहितीचे पृथक्करण यासाठी या फोटोग्राफीचा वापर केला जातो. पोलिस, डिटेक्टिव्ह इन्व्हेस्टीगेशन शाखा

यांना यातील तज्ज्ञांची गरज भासते. फॉरेन्सिक फोटोग्राफी हा यातील एक मुख्य भाग आहे. गुन्हे अन्वेषण चोऱ्या, अपघात अशांसाठी रेकॉर्ड निर्माण करण्यासाठी ही फोटोग्राफी जास्त प्रमाणावर आज वापरली जाते. वरील प्रकारच्या फोटोग्राफी अभ्यासक्रम पुढील संस्थांमध्ये शिकविले जातात, त्या संस्थांची नावे पुढीलप्रमाणे :

१) फर्ग्युसन महाविद्यालय, पुणे
२) इन्स्टिट्युट ऑफ ऑडिओ व्हिज्युअल एज्युकेशन ॲण्ड कम्युनिकेशन, १७५६, सदाशिव पेठ, पुणे -३०
३) जे. जे. इन्स्टिट्युट ऑफ अप्लाईड आर्ट, मुंबई-१
४) सोमय्या कॉलेज ऑफ आर्टस्, कॉमर्स, विद्याविहार मुंबई - ४०००७७
५) इंडो अमेरिकन सोसायटी, फोर्य, मुंबई - ४०० ००१
६) विवेकानंद एज्युकेशन सोसायटी, चेंबूर, मुंबई - ४०००७१
७) गरवारे इन्स्टिट्युट ऑफ करिअर एज्युकेशन डेव्हलपमेंट, सांताक्रुझ, मुंबई-४०००९८
८) फोटोग्राफिक सोसायटी ऑफ इंडिया, डी. एन. रोड, मुंबई - ४०००२०
९) एस. एन. डी. टी. वुमेन्स युनिर्व्हसिटी, मुंबई - ४०००२०
१०) नॅशनल इन्स्टिटट्युट ऑफ फोटोग्राफी, शिवाजी पेठ, कोल्हापूर - १२
११) अलाहाबाद विद्यापीठ, अलाहाबाद - २११००२
१२) व्हेर्व्ह व्हिज्युअल्स सी. एम. एच. रोह, इंदिरानगर, बेंगलोर - ५६००३८
१३) काशी विद्यापीठ, वाराणसी - २२१००१
१४) इंडिया इंटरनॅशनल फोटोग्राफिक कौन्सिल, १२, मॉडर्न, नवी दिल्ली - ११०००१
१५) तसेच भारतातील पॉलिटेक्निक्स विद्यापीठे आय. टी. आय. व खाजगी शिक्षण संस्थांमधून हे शिक्षण मिळू शकते.

**फोटोग्राफीचे अभ्यासक्रम पुढीलप्रमाणे :-**

| नं. | अभ्यासक्रम | पात्रता | कालावधी | संस्था |
|---|---|---|---|---|
| १. | बेसिक कोर्स इन फोटोग्राफी | १० वी | १ वर्ष | फिजिक्स डिपार्टमेंट, फर्ग्युसन महाविद्यालय, पुणे - ४ |
| २ | सर्टिफिकेट कोर्स इन फोटोग्राफी | १० वी | १ वर्ष | १) फोटोग्राफीक स्कुल ॲण्ड स्टुडिओ, ५१६, सदाशिव पेठ, पुणे. |
| ३ | डिप्लोमा इन फोटोग्राफी अडव्हर्टायझिंग (जाहिरात तंत्र) | १२ वी | १ वर्ष | २) स्कुल ऑफ फोटोग्राफी, नागपूर भोपाळ विश्वविद्यालय, भोपाळ - ६ |

| नं. | अभ्यासक्रम | पात्रता | कालावधी | संस्था |
|---|---|---|---|---|
| १. | जाहिरात तंत्र प्रमाणपत्र | १० वी | १ वर्ष | डॉ. बाबासाहेब आंबेडकर, मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद |
| २. | मास मिडिया पदवी | १२ वी | ३ वर्षे | १) सोमय्या इन्स्टि. ऑफ जर्नालिझम व मास कम्युनिकेशन विद्यानगर, विद्याविहार मुंबई - ७<br>२) सोफिया कॉलेज, वसंतकुमार सोमाज पॉलि. बी. देसाई रोड, मुंबई-३६ |

# पर्यटनाच्या क्षेत्रात मंदीतही संधी


एकीकडे मंदीची चर्चा आणि दुसरीकडे देशविदेशात पर्यटकांचा वाढता ओघ असं चित्र सध्या बघायला मिळत आहे. असं असेल तर पर्यटक नेमके कसे फिरतात, कुठे फिरतात, त्यांना नेमकं काय हवं असतं? अन्न, वस्त्र, निवारा या मानवांच्या मुलभूत गरजा, जगण्याची सारी धडपड याभोवती गुंफलेली असते. असे असले तरी या गरजांबरोबरच त्याला ओढ असती ती स्वत:चे जगणे समृद्ध करून घेण्याची. म्हणूनच स्वत:च्या आवडीनुसार, कुवतीनुसार अनेकविध छंद जोपासत तो आपली भूक भागवत असतो. पण केवळ इतक्यावरच तो थांबत नाही, त्यापुढेही जाऊन जिवाला चार घटका विश्रांती, धकाधकीच्या आयुष्यातून थोडा विरंगुळा जोपासत असतो.

पुर्वी धार्मिक कारणाने अथवा व्यापार उदिमासाठी माणसाने भरपूर भटकंती केली. कालौघात तंत्रज्ञान प्रगत होत गेले. त्यातही शेकडो पर्याय आले. दळणवळण सुखर झाले आणि आनंदासाठी पर्यटन या कल्पनेला वाव मिळत गेला. चार पैसे हातात खेळू लागल्यावर तर देशांतर्गत होत असलेले पर्यटन थेट देशापर्यंत ते परदेशापर्यंत वाढत गेले. आनंद घेऊ लागले. आज साऱ्या जगावर मंदीचे सावट आहे. मोटर निर्मितीसारख्या उद्योगाला काही काळ चक्क आपले उत्पादन थांबून ठेवावे लागत असले तरी पर्यटन व्यवसायाला अशी खीळ बसलेली नाही.

खरे तर मंदी, रूपयाचे मूल्य घसरणे, महागाई या साऱ्याचा थेट परिणाम पर्यटनावर होत असतो. अर्थात आज तो आपल्याकडेदेखील जाणवत आहेच, पण साधारण दहा वर्षांपासून पर्यटनाच्या या प्रकारात चांगल्याच प्रकारे वाढ झाली आहे आणि प्रत्येक देश परकीय चलन जास्तीत जास्त कसे वाढेल यासाठी आपल्या देशात पर्यटनाच्या वेगवेगळ्या संधी उपलब्ध करून त्यांच्यात बदल करून आपल्या देशात पर्यटनाचा विकास करत आहेत. ज्यामुळे लोक त्या पर्यटन स्थळांकडे आकर्षित होतात आणि त्यामुळे रोजगाराच्या संधी मोठ्याप्रमाणात उपलब्ध झाल्या आहेत.

# पर्यटन क्षेत्रातील सेवा संधी



| नं. | अभ्यासक्रमाचे नाव | पात्रता | कालावधी | संस्था |
|---|---|---|---|---|
| १ | डिप्लोम इन ट्रॅव्हल ॲण्ड टुरिझम | १० वी पास | ३ वर्ष | इन्स्टि. ऑफ हॉटेल मॅनेजमेंट ॲण्ड केटरींग मॅनेजमेंट ॲण्ड टुरिझम टेक्नॉलॉजी, पुणे – ५ व मुंबई. |
| २ | बॅचलर ऑफ टुरिझम | १२ वी पास | ३ वर्षे | ---- ''------- |
| ३ | बॅचलर ऑफ सायन्स इन हॉटेल अॅण्ड टुरिझम स्टडीज | १२ वी पास | ३ वर्षे | ---- ''------- |
| ४ | डिप्लोमा इन फ्रंट ऑफीस ॲन्ड मॅनेजमेंट ॲण्ड टुरिझम | पदवी | १ वर्ष | ---- ''------- |
| ५ | गाईड ट्रेनिंग कोर्स | पदवी | १० आठवडे | भारत सरकार, पर्यटन कार्यालय, १२३, महर्षि कर्वे मार्ग, चर्चगेट, मुंबई |
| ६ | डिप्लोमा इन इंटरनॅशनल ट्रॅव्हल ॲण्ड टुरिझम | पदवी | ६ महिने | निर्मला निकेतन, ४९, न्यू मरीन लाईन्स, मुंबई –२० |
| ७ | पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा इन टुरिझम मॅनेजमेंट | पदवी | १ वर्ष | कमिन्स टेक्निकल एज्युकेशन इन्स्टि. नागपूर, सोफिया कॉलेज, मुंबई. |
| ८ | डिप्लोमा इन ट्रॅव्हल ॲण्ड टुरिझम | पदवी | १ वर्ष | युनि. डिपार्टमेंट ऑफ डिस्ट्री, औरंगाबाद एस. एन. डी. टी. कॉलेज, चर्चगेट, मुंबई |
| ९ | डिप्लोमा इन हॉटेल मॅनेजमेंट ॲण्ड ट्रॅव्हल टुरिझम (BHMTT) | १२ वी | ३ वर्षे | तांत्रिक संचलनालयातंर्गत येणाऱ्या हॉटेल मॅनेजमेंट संस्था |
| १० | डिप्लोमा इन म्युझिऑलॉजी | पदवी | १ वर्षे | सेंटर फॉर ॲडव्हान्स स्टडीज इन इंडॉलॉजी ॲण्ड म्युझिऑलॉजी, भोपाळ – ६ |
| ११ | डिप्लोमा इश्र अर्काइव्हजन किपींग | एम. एस. | १ वर्षे | १) इन्स्टि, ऑफ अर्काइव्हज ऑफ इंडिया, जनपथ, नवी दिल्ली–१. २) नॅशनल अर्कानव्हज ऑफ इंडिया, जनपथ, नवी दिल्ली–१ |

# पर्यटन क्षेत्र

पर्यटन हा वाहतुकीची साधने आणि पेट्रोलियम उत्पादनानंतर जगातील महत्त्वाचा व्यवसाय आहे. पर्यटन क्षेत्र हे कोण्याही देशाला परकीय चलन देणारे क्षेत्र होय.

भारतामध्ये देशातील तसेच परदेशातील पर्यटकामुळे पर्यटन व्यवसाय वाढीस लागला आहे. पर्यटन व्यवसायामुळे ट्रॅव्हल कंपन्या, हॉटेल व्यवसाय, विमान कंपन्या, रेल्वे, बसेस, टॅक्सीज, रस्ते, टुरिस्ट गाईडस, मनोरंजनाची साधने, दुरध्वनी सेवा अनेक छोट्या मोठ्या वस्तूंची विक्री अशा संबंधित उद्योगांना वाव ही मिळतो. पर्यटन व्यवसायामुळे अनेक स्थानिकांना मोठ्या प्रमाणावर रोजगार मिळतो. ज्यांना प्रवासाची आवड निरिक्षणक्षमता, सौंदर्य दृष्टी, इतिहास-भूगोल या विषयांची जाण, संवाद कौशल्य, आर्थिक बाबींचे ज्ञान इत्यादी गोष्टी असतील त्यांनी पर्यटन क्षेत्राकडे वळावे. यामध्ये रोजगाराच्या संधी मोठ्या प्रमाणावर उपलब्ध आहेत.

*** टुर ऑपरेटर्स :**

हे प्रवासाचे संपूर्ण नियोजन करतात. टूर गाईड म्हणून अनुभव आल्यानंतर या पदावर काम करता येते.

*** ट्रॅव्हल एजन्सी :**

यांचे अनेक लोक ग्राहकांना एजन्सीशी जोडतात. आता ऑनलाईनही ग्राहक जोडता येतात. ग्राहकांशी संवाद साधून अनेक प्लॅन ते देत असतात आणि ग्राहकांना कंपनीशी संपर्क करून देतात.

*** हॉटेल क्षेत्र :**

पर्यटन आणि हॉटेल क्षेत्र या दोन्हींचा संबंध अनन्यसाधारण आहे. प्रवासात मुक्कामाची सोय करण्याचे काम एकमेकांच्या साहाय्याने केले जाते. यावर आकर्षक सवलती देऊन ग्राहक मिळवण्याकडे कल असतो. जवळजवळ एक लाख कुशल मनुष्यबळाची गरज या व्यवसायाला सध्या आहे.

*** विमान कंपन्या :**

विमान कंपन्यांसाठी काम करणे ही वेगळा आनंद देणारी संधी असते. इतर व्यवस्थापन अभ्यासक्रम पूर्ण असल्यास प्राधान्याने संधी मिळते. त्याचबरोबर आकर्षक वेतनही दिले जाते.

*** वाहतूक सेवा :**

पर्यटन व्यवसायाला वाहतूक सेवा मोठा हातभार लावत असते. अनेक खाजगी सेवा देणाऱ्या कंपन्या कार्यरत आहेत. आरक्षक आणि आकर्षक सवलती तसेच पॅकेज देण्याचे काम या क्षेत्रातही लोक करतात. प्रवासासाठी वाहनांची उपलब्धताही मागणीनुसार करून दिली जाते.

*** वेतन :**

या क्षेत्रात पगाराच्या चांगल्या संधी उपलब्ध आहेत. पण हे उमेदवाराच्या योग्यतेवर अवलंबून असते. सुरूवातीस पंधरा ते विस हजारापर्यंत वेतन मिळते. अनुभवानंतर आकर्षक वेतन आणि पॅकेज मिळू शकेल.

# संधी

कोणत्या विभागात काम करू शकता?

निवास, वाहतूक, अन्न समारंभ, साहसी पर्यटन अगदी सेवा देणारे हे क्षेत्र आहे. तुमच्या आवडीनुसार यातील अनेक विभागात काम करता येईल.

*** संधी :**

स्पर्धा परिक्षांच्या माध्यमातून पर्यटन विभागात नोकरीच्या संधी मिळतात. पर्यटन संचालनालयाच्या माध्यमातूनही अनेक पदे भरली जातात. सरकारी नोकरीत येण्यासाठी मात्र या विषयातील पदवी प्राप्त असणे गरजेचे आहे. तसेच अनेक परदेशी कंपन्यात संधीही आहेत. अनेक विमानसेवा प्रदान करणाऱ्या कंपन्यांना या क्षेत्रातील कुशल मनुष्यबळाची आवश्यकता असते. खाजगी समुहात व्यवस्थापन आणि आदी बाबींसाठी उत्तम वेतनही मिळते.

*** पर्यटन विभाग :**

आरक्षण, विपणन, विक्री, नियोजन, मार्गदर्शन यासाठी अनेक जागा भरल्या जातात.

*** माहिती सहाय्यक :**

हा उपलब्ध पर्यटनासंबंधी जागा आणि तिथे मिळणाऱ्या सेवांची तपशीलवार माहिती देण्याचे काम करतो. त्याच्या सहकार्यामुळे प्रवाशांना योग्य नियोजन करण्यास मदत होते.

*** गाईड ( मार्गदर्शक ) :**

पर्यटन मंत्रालय गाईडला मान्यता देते. प्रादेशिक, राज्य आणि स्थानिक असे तीन प्रकार त्यात पडतात. ह्या परवान्याचे दर दोन वर्षांनी नुतनीकरण करता येते. स्थळांची सविस्तर आणि इत्यंभूत माहिती देणे आणि सांस्कृतिक परंपरा आदीच्या माहिती देण्याचे काम गाईड करत असतो. त्याच्याकडे उत्तम संवाद कौशल्य असायला हवे कारण प्रत्यक्ष स्थळांवर जाऊन मार्गदर्शन करत असतो. एकंदरित गाईड हा महत्त्वाचा दुवा असतो.